(निशाण १४५ व १४६ वरील दस्तऐवज प्रस्तुत साक्षीदारास दाखवून सदर दस्तऐवज अस्तित्वात असल्याबाबतचा पुरावा या साक्षीदारामार्फत देता येणार नाही अशी हरकत वादीच्या वकिलांनी घेतली. या हरकतीला प्रतिवादीच्या वकिलांनी असे नमूद केले की दस्तऐवज करणारी व्यक्ती आजरोजी हयात नाही. हे तथ्य अविवादीत आहे. तसेच सदरचा दस्तऐवज हा ३० वर्षापेक्षा जुना असल्यामुळे त्याला पुराव्यात वाचता येईल. सदर दस्तऐवजाला यापूर्वीच ओळखण्यासाठी निशाण देण्यात आलेले आहे. या साक्षीदाराला दस्तऐवज करुन घेणा—या व्यक्तीचा सही ओळखण्याचा पुरावा देता येवू शकतो. सबब प्रतिवादीने सादर केलेले पुराव्यास अधिन राहून सदर दस्तऐवज पुराव्यात वाचता येवू शकेल. )

**प्रतिवादी क्र. २ हे प्रतिवादी क्र. १ यांना सामिल असल्यामुळे त्यांचेमार्फत उलटतपास नाही.**

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एस. आर ओगले यांचे मार्फत**

१८. माझे शिक्षण एस.एस.सी पर्यंत झालेले आहे. मी लहाणपनापासून गावात आहे. हे महणणे खरे आहे की सुलोचना भाटकर यांची बहीण चंपु उर्फ लक्ष्मी गोविंद मांजरेकर या मयत आहेत व त्यांचे पती देखील मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्यांना मुलबाळ नाही. हे म्हणणे खरे आहे की हिराबाई उर्फ सुंदराबाई गणपत नार्वेकर या निसंतान मयत झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की सुलोचनाला दावा मिळकतीमधील हक्क त्यांचे माहेरहून आलेले आहेत. मला याची माहिती नाही की दावा मिळकतीमध्ये सुलोचनाचे वडिल अर्जुन दादु तांडेल यांचे भाऊ रघुनाथ दादु तांडेल यांचा अधिकृत हक्क होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती या अर्जुन तांडेल यांचेकडे वाडवडिलार्जित कडून आलेल्या होत्या.

१९. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही दावा मिळकतींचे स्थानिक नाव 'शेंडयाचे भाटले' आहे. मला याची माहिती नाही की 'शेंडयाचे भाटले' येथे अर्जुन तांडेल किंवा रघुनाथ तांडेल यांच्या आणखी जमिनी नाहीत किंवा कसे. (साक्षीदाराला निशाण १४३ वरील पान क्र. १, २ व ३ वरील सहया दाखविण्यात आल्या.) हे म्हणणे खरे आहे की सदर सहया माझे काकी सुलोचना भाटकर यांचे आहेत. ( प्रतिवादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की साक्षीदाराला दाखविण्यात आलेले निशाण १४४ वरील मृत्युपत्र हे छायांकित प्रतीत

आहे. तसेच त्याचेवरील सही देखील छायांकित प्रत आहे त्यामुळे जोपर्यंत ते मृत्युपत्र शाबीत होत नाही तोपर्यंत ते पुराव्यात वाचता येत नाही. वादीच्या वकिलांनी असे सांगितले की मृत्युपत्र हे वाचता येईल किंवा कसे हे कालांतराने ठरवता येईल. त्यामुळे या क्षणी साक्षीदाराला सहया दाखविता येतील. अशा परिस्थितीमध्ये मी निशाण १४४ वरील मृत्युपत्र याला निशाण देत असताना दुय्यम पुरावा देण्याबाबत जे काही कारण घडलेले आहे त्याची योग्य अयोग्यता पडताळणी करुन मृत्युपत्र वाचता येईल किंवा कसे हे ठरविता येईल असा आदेश केलेला आहे. सबब, त्या आदेशास आधीन राहून व मृत्युपत्राला अपेक्षित असलेल्या पुराव्यास आधिन राहून आता प्रश्न विचारता येईल.)

२०. मोहन मंगेश तांडेल व स्नेहलता दत्तात्रय वेंगुर्लेकर हे माझे ओळखीचे नाहीत. मला याची माहिती नाही की हिराबाई उर्फ सुंदराबाई कोम गणपत नार्वेकर हिने मृत्युपत्राने दावा मिळकतीमधील हक्क वसंत पांढरे यांना दिले किंवा कसे. तुकाराम यशवंत साळगांवकर माझे माहितीचे नाहीत. राधाकृष्ण बापु तांडेल आणि पांडुरंग लाडु तांडेल या व्यक्ती माझे माहितीच्या नाहीत. रमाकांत बाळकृष्ण कुलकर्णी, शंकर गोविंद केळुसकर, राजाराम सावळाराम बागायतकर माझे माहितीचे नाहीत.

२१. हे म्हणणे खरे आहे की दावा जमिनी या वेंगुर्ला शहरापासून जवळच्या आहेत. मला हे सांगता येणार नाही ३०—४० वर्षापूर्वी त्यांच्या किमती ब—यापैकी होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की सखाराम विठु भाटकर हे माझे काका नोकरीनिमित्त जे.जे.हॉस्पिटल मुंबई येथे होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांना चांगल्यापैकी पगार होता.

प्रश्न— ते रिटायर झाले तेव्हा त्यांना प्राव्हीडंट फंड व ग्रॅच्युईटी यांची ब—यापैकी रक्कम मिळाली?

उत्तर— मिळाली असेल पण किती मला माहित नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की त्यांना निवृत्तीवेतन होते. भाटकर कुटुंबियाची अंदाजे ३ एकर इतकी जागा वेतोरा गावी आहे. भाटकर यांचे मुळ गांव वेतोरा आहे व आमचे सर्व कुटुंब वेतोरामध्ये रहाते. सदर ३ एकर जागेमध्ये आमची भातशेती आहे. भेंडमळयापासून आमचे वेतो—यातील घर अठरा एक किमी आहे.

२३. हे म्हणणे खरे नाही की सुलोचना भाटकर व तिचे पती त्यांच्या वृध्दापकाळी

औषधोपचार घेण्यासाठी वादी याचेकडे मुंबई येथे जात होते. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना भाटकर व त्यांचे पती हे त्यांचे मृत्युपर्यंत खाऊन–पिऊन सुखी होते. असे काही घडले नाही की त्यांचे उत्पन्न मी काढून घेत होतो व त्यांची उपासमार होत होती. असे काही घडलेले नाही की सुलोचना यांच्या माहेरची मिळकत मी अगर आमचे कुटुंबियातील सदस्यांनी विकायला लावली. असे काही घडले नाही की तिच्या जमिनींना मी गि–हाईक आणून दिले. असे काही घडले नाही की मी तिच्याकडून तिच्या माहेरीच्या मिळकतीबाबत काही करार करुन घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना हिच्या माहेरच्या मिळकतीच्या व्यवस्थापनामध्ये आम्ही कधीही हस्तक्षेप केला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्याच्यामुळे अणुसरकरांबरोबर म्हणजे प्रतिवादी क्र. २ यांचेसोबत झालेल्या व्यवहाराबाबतची गोष्ट मला तिच्या हयातीपर्यंत माहित नव्हती.

२४. हे म्हणणे खरे आहे की मंगेश लाडु अणसुरकर यांनी सुलोचनाच्या मृत्युनंतर आमचेकडे केव्हाही खरेदीखत करुन घेण्याची किंवा प्रांताकडे जावून परवानगी घेण्याची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी स्वत: अणसुरकर म्हणजे प्रतिवादी क्र. २ यांना दावा जमिन क्र. २ विक्रीत देण्याची तयारी किंवा त्याकरीता लागणारी परवानगी घेण्याची तयारी सांगितली नाही. हे म्हणणे खरे नाही की सुलोचनाच्या पश्चात माझेकडे दावा मिळकतीचा मालकी हक्क किंवा कब्जा आलेला नसल्यामुळे अणसुरकरांनी मला खरेदीखताबाबत विचारणा करण्याचे अथवा मला त्याला विचारणा करण्याचा प्रश्न आला नाही.

२५. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना हिने दावा जमिन क्र. २ विकायची आहे व त्याबाबत परवानगी घ्यायची आहे त्याबाबत मला मदत कर असे मला कधी सांगितले नाही.

प्रश्न– मंगेश लाडु अणसुरकर यांना तुम्ही अंदाजे किती वर्षापासून ओळखता?
उत्तर– मंगेश लाडु अणसुरकर याला आजपासून मागे आठ दहा वर्षापासून ओळखतो.

हे म्हणणे खरे नाही की ते मोलमजुरी करायचे. अणसुरकर यांची जमिन किती होती हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की वर्षभर भात पुरेल इतकी शेती होती.

प्रश्न– त्यांना त्यांचा व त्यांचे कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांना मोलमजुरी करावी लागत होती?

उत्तर— कोकणातील माणसाला मोलमजुरी करावी लागते.

हे म्हणणे खरे नाही की दुस—यांना पैसे देवून जमिन खरेदी करण्याची त्यांची आर्थिक कुवत नव्हती.

२६. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती या मुळ दादु तांडेल यांच्याकडे कुळपणास होत्या, त्यांच्याकडून तो कुळपणा त्यांचे मुलगे रघुनाथ व अर्जुन यांना प्राप्त झाला. हे म्हणणे खरे नाही की त्या दोघांचे मृत्युनंतर त्यांच्या मुलींना हक्क प्राप्त झाले. हे म्हणणे खरे नाही की हिराबाई उर्फ सुदंराबाई नार्वेकर, सुलोचना भाटकर व चंपु उर्फ लक्ष्मी मांजरेकर यांना मुलबाळ नसल्यामुळे दावा मिळकती वादी यांना वारसाने प्राप्त झाल्या. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये कब्जा हा आजरोजी वादी यांचेकडे आहे. मला याची माहिती नाही की २१/०६/१९६४ रोजी मृत्युपत्र करुन हिराबाई उर्फ सुदराबाई नार्वेकर यांनी तिचा दावा मिळकतीमधील हिस्सा वादी यांना दिला. हे म्हणणे खरे आहे की गुणवंती तांडेल यांनी १/१२/१९६२ रोजी दावा मिळकतींबाबत मृत्युपत्र केले. ते मृत्युपत्र दाखविल्यास मी ओळखु शकणार नाही. हे म्हणणे खरे आहे की गुणवंती तांडेल हिने सुलोचना भाटकर हिचे लाभात केलेले मृत्युपत्र मी केव्हाही पाहिलेले नाही व ते माझे ताबेत नाही.

२७. हे म्हणणे खरे नाही की एप्रिल २०१३ च्या पहिल्या आठवडयामध्ये मी व प्रतिवादी क्र. २ दावा मिळकतीमध्ये जबरदस्तीने व अनाधिकाराने घुसलो व आम्ही वादी यांना अर्वाच्च शब्दात शिवगाळ करुन '' जमिन तुझी नसून माझी झालेले आहे असे म्हणुन जमिन ताब्यातून काढून घेण्याची धमकी दिली.'' हे म्हणणे खरे नाही की सुलोचना भाटकर यांनी दावा मिळकत क्र. २ बाबत निशाण १४५ व १४६ वर जे करार केले व करारानुसार मोबदला दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सुलोचना भाटकर यांनी दावा जमिनीचा ताबा दिला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सुलोचनाच्या मृत्युनंतर दावा मिळकतीचा ताबा माझेकडे आला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे साक्षीमध्ये वादीच्या हिताविरुध्द सांगितलेला सर्व मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by Vinayak Dattatray Patil
Date: 2020.01.28 11:16:51 +0530

दिनांक :—२३/०१/२०२०.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.